पुढारी
www.pudhari.com

# ‘रवळनाथ’च्या कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण

## एम. एल. चौगुले : पाच लाखांची अपघात विमा योजना

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे कर्मचाऱ्यांना पाच लाखांच्या अपघात विमा योजनेतून विमा संरक्षण देण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

ते म्हणाले, संस्थेचा दी न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनीसोबत यासंदर्भात करार झाला आहे. संस्थेच्या १३५ कर्मचाऱ्यांना यापूर्वी दोन लाखांची मेडिकल कव्हर विम्याच्या माध्यमातून दिली जात असुन आता ५ लाखांच्या अपघाती विमा योजनेत कर्मचाऱ्यांचा समावेश करुन कर्मचारी व त्यांची कुटुंबेदेखील सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण देणारी ही गडहिंग्लज परिसरातील एकमेव संस्था आहे.



**गडहिंग्लज : आप्पासाहेब पाटील यांच्याकडे विमा योजनेचा धनादेश देताना एम. एल. चौगुले. शेजारी डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजयकुमार घुगरे, प्रा. डॉ. किरण पोतदार, महेश मजती, प्रा. डॉ. मनोहर पुजारी, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, डी. के. मायदेव.**

प्रारंभी, दी न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनीचे गडहिंग्लज येथील शाखाधिकारी आप्पासाहेब पाटील यांच्याकडे विमा योजनेत सहभागी होण्यासाठी धनादेश सुपूर्द करण्यात आला. आप्पासाहेब पाटील यांनीही कर्मचाऱ्यांना अपघाती विमा योजनेचे महत्व पटवून दिले. योजनेच्या लाभाविषयी माहिती दिली.

यावेळी संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्रा. विजयकुमार घुगरे, प्रा. डॉ. किरण पोतदार, महेश मजती, प्रा. डॉ. मनोहर पुजारी, मीना रिंगणे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

Belgaum Edition
May 25, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com